" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार "
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे**

# विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर

कोल्हापूर

## जागतिक एड्स दिवस

## अ ह वा ल

1 डिसेंबर, 2024 हा दिवस जागतिक एड्स दिवस म्हणून साजरा केला जातो. विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सोमवार दि.02.12.2024 महाराष्ट्र शासनाचा आदेशाप्रमाणे एड्स नियंत्रण व निर्मूलन करण्याच्या दृष्टीने समाज जागृती करण्यासाठी, प्रगत समाजाला अधिक विकसित करण्याच्या दृष्टीने वेगवेगळे उपक्रम राबवून नियंत्रणासाठी प्रयत्न केले गेले.

मा.प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांच्या मार्गदर्शनानुसार ज्युनिअर, सीनियर विभागातील एन एस एस स्वयंसेवक व एनसीसी कॅडेट यांचे सहभागातून एड्स विषाणूच्या प्रतिकृतीतून सर्वांनी एड्स नियंत्रणासाठी सतर्कता व सावधानतेच्या दृष्टीने शपथ घेतली.

पंचगंगा हॉस्पिटल, गंगावेश, कोल्हापूर येथील वैद्यकीय अधिकारी मा. सौ.सुरेखा जाधव मॅडम यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून प्रतिपादन केले की आज समाजामध्ये आपल्या सतर्कतेमुळे एड्सचे प्रमाण किती प्रमाणात कमी होत आहे. समाजात जीवन जगत असताना जे लोक एचआयव्ही पॉझिटिव्ह आहेत त्यांना नवीन जीवन जगण्याची हिंमत देण्यासाठी त्यांचे मनोबल कसे वाढविले पाहिजे ? त्या रुग्णाला आधार देणे, समाजामध्ये असलेल्या एड्स विषयीच्या चुकीच्या समजुती दूर करून आज आपण सर्वांनी एकत्र येऊन एड्स व टी बी सारख्या महाभयंकर अशा व्याधीना आपल्यातून हद्दपार कसे करावे व निरोगी जीवनाचा आस्वाद घ्यावा. काही प्रमाणात शिल्लक राहिलेला एड्स हा विषाणू पूर्णत्वाने नाहीसा करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. सदर कार्यक्रमास प्राचार्य डॉ.आर आर कुंभार, प्रबंधक श्री आर बी जोग, जिमखाना विभाग प्रमुख, एनसीसी व एन एस एस प्रमुख तसेच इतर प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

मंगळवार दि.03.12.2024 रोजी सकाळी 8 वाजता राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक सी पी आर हॉस्पिटल, दसरा चौक, कोल्हापूर या ठिकाणी 1 डिसेंबर, 2024 हा जागतिक एड्स दिवस कार्यक्रम प्रसंगी उपस्थित राहिले. एड्स दिवसाचे औचित्य साधून सबंध वर्षभरात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी ज्या कर्मचाऱ्यांनी एड्स नियंत्रण व निर्मूलन तसेच जनजागृती यासाठी स्तुत्य कार्य केले त्यांचा यथोचित सन्मान केला गेला. जिल्ह्यातील सर्व वैद्यकीय अधिकारी, शल्य चिकित्सक यांच्या वतीने समाजाला उद्बोधन करणारी मार्गदर्शक अशी भाषणे संपन्न झाली. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कोल्हापूर शहरातील सर्व शाळा कॉलेजातील विद्यार्थी व स्वयंसेवक बहुसंख्येने या कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते. एड्सला घाबरून न जाता प्रतिबंध करून, सावधान देणे व प्रामाणिकपणे जीवन जगले पाहिजे. एड्स नियंत्रण करणाऱ्या जिल्ह्यातील वेगवेगळ्या

ठिकाणी कार्यरत असणाऱ्या एड्स नियंत्रण संस्था या कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे उद्बोधन करणारे बॅनर व यशला हरवण्यासाठी घोषणाबाजीच्या माध्यमातून रॅलीची सुरुवात झाली.

सी. पी. आर. हॉस्पिटल मधून निघालेली रॅली एड्स नियंत्रण विषयक वेगवेगळ्या घोषणा देत दसरा चौक --- कोंडाओळ –लक्ष्मीपुरी -बिंदू चौक--शिवाजी पुतळा--कोल्हापूर महानगरपालिका-- सीपीआर हॉस्पिटल अशा मार्गाने भव्य रॅली संपन्न झाली. जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला. शेवटी जिल्हा शल्य चिकित्सक विभागामार्फत सर्व विद्यार्थ्यांना बिस्किट वाटप करण्यात आले. ज्या शाळा कॉलेजातील विद्यार्थ्यांनी या उपक्रमामध्ये सहभाग नोंदवला त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. एड्स,टी बी यासारख्या रोगांना हरवणे म्हणजे राष्ट्राच्या विकासाला गती देणे हा उद्देश पूर्ण झाला.

सदर रॅलीमध्ये वरिष्ठ विभागातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.पी.आर.बागडी , ज्युनिअर विभाग रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी श्री एल एस नाकाडी, डॉ. ए.जे.पाटील , एनसीसी प्रमुख मेजर सुनिता भोसले व स्वयंसेवक सहभागी झाले होते.

श्री एल. एस. नाकाडी
PROGRAMME OFFICER
N. S. S + 2
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

डॉ.आर. आर.कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# जागतिक एड्स दिवस

दि. 1.12.2024












भाई हारेगा
बी हारेगा
कोल्हापूर
Shri Swami Vivekanand
savitribai Phule
nursing
come join us for
जागतिक
विषय :-
TAKE THE RIGHTS
Activity - roleplay &street

महाराष्ट्र शासन
# जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक
छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर
dpokolhapur@mahasacs.org
०२३१२५०१२१

जा.क्र./डिएप्रिकंयु/जाएदि/२०२४/७१२

दिनांक :२५/११/२०२४.

प्रति,
प्राचार्य
विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
INWARD
No. 1110
Date 29/11/2024
EMPOWERED AUTONOMOUS

विषय :- जागतिक एड्स दिन २०२४ निमित्त आयोजित जनजागृती प्रभातफेरीस उपस्थित राहणेबाबत.

एच्.आय्.व्ही/एड्सच्या जनजागृतीसाठी कोल्हापूर जिल्हयातून होणारे प्रयत्न आणि त्या अनुशंघाने घेण्यात येणारे उपक्रम हे नेहमीच परिणामकारक राहीलेले आहेत. एच्.आय्.व्ही/एड्स बाबत समाजावर होणारा परिणाम आणि त्यातील युवकांचे असलेले स्थान, या गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत.

१ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून पाळण्यात येतो. यंदाचे "Take the rights path ( टेक द राईट्स पाथ )" हे ब्रीदवाक्य असून, एड्स संपविण्याच्या दिशेने वाटचाल करणारी ही संकल्पना राबविण्यात येत आहे. विविध उपक्रमांच्या माध्यमांतून लोकांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी, यासाठी जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून दिनांक ०३/१२/२०२४ रोजी सी. पी. आर. हॉस्पिटल येथून सकाळी ठीक ८.०० वा. भव्य प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी या प्रभातफेरीसाठी आपल्या संस्थेतील एन्.एस्.एस्. व एन्.सी.सी. यांसह सर्व विद्यार्थी - विद्यार्थीनी या रॅलीमध्ये उपस्थित रहावेत. ही विनंती.

श्री संदिप पाटील | मेजर भोसले
श्री सावंत | ले. प्रा. भोसले
29/11/2024

जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर

29.11.24

महाराष्ट्र शासन
# जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक
छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर
dpokolhapur@mahasacs.org ०२३१ २५०१२१

CIVIL SURGEON OFFICE C.P.R. HOSPITAL, KOLHAPUR

जा.क्र./डिएप्रिकंयु/जाएदि/२०२४/७५३

दिनांक : ०३/१२/२०२४.

प्रति,

प्राचार्य

विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर.

विषय :- जागतिक एड्स दिन निमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागाबाबत.

एड्स नियंत्रणामध्ये आजपर्यंत आपण दिलेल्या योगदानाबद्दल शतशः धन्यवाद !

सी.पी.आर. हॉस्पिटल व जिल्हा एड्स प्रतिबंध आणि नियंत्रण पथक कोल्हापूर यांच्या वतीने दि.०३/१२/२०२४ रोजी आयोजित, एच.आय.व्ही./एड्स जनजागरण प्रबोधन रॅली मध्ये आयोजित कार्यक्रमात आपण व आपले विद्यार्थी यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन, एड्स नियंत्रणामध्ये मोलाचा वाटा उचलल्याबद्दल आम्ही शतशः आभारी आहोत.

यापुढेही असेच योगदान असावे.

जिल्हा शल्यचिकित्सक, कोल्हापूर.

# मानवी जीवन समृद्धीसाठी रोगमुक्त असावे

## सुरेखा जाधव : विवेकानंद कॉलेजमध्ये एड्स दिन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मानवी जीवन संपन्न आणि समृद्ध बनवण्यासाठी रोगमुक्त असले पाहिजे. २१ व्या शतकाच्या मध्यापासून संपूर्ण मानव जातीस शाप ठरलेला एचआयव्ही हा जीव घेणारा संसर्गित होणारा रोग विकसनशील आणि मागास देशांमध्ये मानवी आरोग्यास आवाहन ठरत आहे, असे मत एचआयव्ही एड्स नियंत्रण विभागाच्या समुपदेशक सुरेखा जाधव यांनी मांडले.

जाधव यांनी एचआयव्ही एड्स संक्रमणाचे मार्ग आणि घ्यावयाची खबरदारी याविषयी माहिती दिली. तसेच युवकांनी आजच्या घडीला या रोगाविषयी सविस्तर माहिती घेऊन त्याविषयी जागरूक व्हावे आणि समाजामध्ये एचआयव्ही संक्रमित व्यक्तींना दिलासा देऊन त्यांना सकारात्मक जीवन जगण्यासाठी सहाय्य करावे, असे आवाहन केले.

यावेळी एचआयव्ही एड्स रोगमुक्त भयमुक्त आणि जागरूक होण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन आयक्यूएसी, एनसीसी आणि एनएसएस विभाग यांच्यामार्फत करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रबंधक रघुनाथ जोग, मेजर सुनीता भोसले, प्रा. संदीप पाटील, प्रा. पी. आर. बागडी, प्रा. अभिजित पाटील, प्रा. एल. एस. नाकाडी, प्रा. किशोर गुजर, डॉ. विकास जाधव उपस्थित होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. प्रास्ताविक लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा यांनी केले, तर आभार प्रा. एम. आर. नवले यांनी मानले.